# संशोधन ग्रंथालय आणि सेवा व सुविधा

**श्री. अनिल तुकाराम येळवंडे**
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ,
सोनई ता.नेवासा जि. अहमदनगर.

**सारांश**

संशोधन ग्रंथालय हे ग्रंथालयाचे एक महत्वाचा प्रकार आहे. संशोधन ग्रंथालय यांची संख्या तुलनेने कमी असते. कारण संशोधन ग्रंथालयामध्ये महत्वाची सेवा -पुरवणे आवश्यक असते. संशोधक संशोधन करताना विशेष संदर्भ साधने, परिपूर्ण ज्ञान , पार्श्वभूमी , आराखडा इ. वापर करून संशोधक सत्य व पडताळून बघत असतात. संशोधन ग्रंथालयामध्ये संशोधकाची सर्व गरज परिपूर्ण केली जाते. त्यासंदर्भात संशोधकास ग्रंथपाल व ग्रंथालय कर्मचारी मदत करत असतात. त्या अनुशंघाने संशोधकास संशोधन ग्रंथालय सतत मदत करत असतात. संशोधनाच्या गरजा देखील पूर्ण केल्या जातात.संशोधन नाविन्यपूर्ण होण्यासाठी संशोधन ग्रंथालयाची भूमिका महत्वाची ठरत असते.

कळ शब्द :- संशोधन ग्रंथालय , वाचन साहित्य , ग्रंथालय सेवा व सुविधा .

**प्रस्तावना :-**

नवीन संशोधन विकास त्या विषयाचा अभ्यास आणि सदर विषय यावरील संशोधन याला खूप महत्व असते. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयामध्ये देखील संशोधन महत्व खूप देखील गरजेचे आहे. संशोधन करताना सतत नवीन ज्ञानाचा विकास होताना दिसत आहे व त्यामध्ये वाढ देखील होताना दिसत आहे. नवीन ज्ञानाचा विकास सतत विकासाला मदत करताना दिसते. संशोधक संशोधन करताना नवीन माहितीचे संग्रह करत असतो. मानवाने संशोधनाच्या बळावर नवीन इतिहास घडविले आहे. २१ व्या शतकात संशोधनाला खूप महत्व प्राप्त झाले आहे. संशोधनाच्या बळावर जागतिक स्तरावर देश त्यांचा ठसा उठवीत आहे. संशोधनासाठी संशोधन ग्रंथालय महत्वाची भूमिका पूर्ण करत आहे. संशोधन परिपूर्ण होण्यसाठी संशोधन ग्रंथालय महत्वाचे कार्य करत आहे. संशोधन ग्रंथालय संशोधक व संशोधन या मध्ये महत्वाची भूमिका निर्माण करत आहे.

**संशोधन व संशोधन ग्रंथालय यांचा सबंध :-**

संशोधन या शब्दाचा अर्थ ' शोध' लावणे असा आहे. कोणतेही संशोधनाची निर्मिती असाच शोधक निर्माण करू शकतो ज्याला संबंधी विषयाचे परिपूर्ण व सखोल ज्ञान आहे. संशोधकास संशोधन करण्यसाठी संबंधी विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त करणे महत्वाचे असते. त्यासाठी संशोधकास संशोधन संदर्भातील पूर्व साहित्यचा आढावा घेणे महत्वाचे असते. संशोधनासाठी संशोधन ग्रंथालय याची भूमिका खूप महत्वाची आहे. संशोधकास संशोधन ग्रंथालयातून खूप मदत होत असते. संशाधकास ग्रंथालय विषयाची व्याप्ती ,मर्यदा, संकलन , निष्कर्ष , तुलना करण्यास मदत करत असतात. संशोधक ग्रंथालय व प्रयोगशाळा याचा वापर संशोधन कालावधीमध्ये करत असतात. संशोधन करताना संशोधक विविध बाबींचा आढावा घेत असतात. संशोधनाचे अनेक विषय असतात त्याप्रमाणे संशोधक विविध बाबींचा आढावा घेत असतात. त्याप्रमाणे संशोधक त्याची संशोधनाची दिशा ठरवत असतात. परंतु सर्व विषयामध्ये ग्रंथालय याची भूमिका महत्वाची राहिली आहे. ग्रंथालय मधील ग्रंथपाल व कर्मचारी सतत त्याप्रमाणे कार्यशील असतात. त्या अनुशंघाने सर्व कर्मचारी संशोधाकास मदत करण्यसाठी प्रयत्नशील असतात.

**ग्रंथालय प्रकार :-**

ग्रंथालयामध्ये ग्रंथालयाचे विविध प्रकार पडतात त्याप्रमाणे संशोधन ग्रंथालय महत्वाचे आहे. खालीलप्रमाणे ग्रंथालय महत्वाची प्रकार आहे.

१. राष्ट्रीय ग्रंथालय
२. सार्वजनिक ग्रंथालय
३. शैक्षणिक ग्रंथालय
४. विशेष ग्रंथालय
५. संशोधन ग्रंथालय
६. बाल ग्रंथालय
७. संदर्भ ग्रंथालय

**राष्ट्रीय ग्रंथालय :-**

संशोधनासाठी महत्वाची भूमिका निर्माण करणारी संशोधन ग्रंथालय खूप महत्वाची संकल्पना आहे. ग्रंथालय मध्ये संदर्ब साधने , उपलब्ध साधने याची भूमिका देखील खूप महत्वाची आहे. संशोधन ग्रंथालय संशोधकास संशोधन पूर्ण करण्यास महत्वाची मदत करत असतात. प्राथमिक ,द्वितीय , तृतीय , प्रलेखन या संदर्भ साधनाचा वापर प्रामुख्याने केला जातो. संशोधनासाठी संशोधन ग्रंथालय खूप महत्वाचे कार्य करत असतात. संशोधकास संशोधन साधने विविध मार्गाने मदत करत असतात. संशोधन ग्रंथालय संशोधकास त्यांच्या उदिष्टे प्रमाणे सतत मदत करत असतात. खालील प्रमाणे संशोधन ग्रंथालय प्रकार असतात्त.

१. संशोधन
- भाभा आटोमिक रिसोर्च संस्था .
- सागर विज्ञान संस्था.
- सार्क संस्था, अहमदाबाद.
- भांडारकर संशोधन संस्था.
- भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे.

२. स्वयंभू संस्था
- सरस्वती महल ,तंजावर.
- खुदाबक्ष ग्रंथालय ,पटना.
- मुंबई ग्रंथालय, संस्था.

**संशोधन ग्रंथालय साहित्य :-**

ग्रंथालय म्हणजे वाचन साहित्य व संग्रह साधने याचा साठा होय. संशोधन ग्रंथालय विशेष सेवा व सुविधाने परिपूर्ण असे संग्रह आहे. संशोधन ग्रंथालय संशोधन संस्था मध्ये चालणारे सर्व प्रकारचे संशोधन साहित्य मदत म्हणून उपलब्ध असणारे ठिकाण असते. प्रत्येक संशोधन संस्थाचे कार्य व रचाना वेगळी असते त्यांप्रमाणे कार्यदेखील चालत असते. खालील प्रमाणे सदर संस्था कार्य व साहित्याचा पुरवठा करत असतात.

- दुर्मिळ साहित्य
- ग्रंथ व आवश्यक साधनसामुग्री
- शासकीय प्रकाशने अहवाल ,पेटट.
- नियतकालिका
- संशोधन अहवाल , विविध प्रकाशन अहवाल .
- मानके , पेटंटस , महत्वाचे निर्णय अहवाल.

- ❖ ताम्रपट , भूजपत्र , हस्तलिखित अहवाल ,चित्रे , माहितीपत्रके .
- ❖ दृकसाहित्य , ध्वनीमुद्रण साधने.
- ❖ संगणकीय प्रणाली.

**संशोधन ग्रंथालय सेवा व सुविधा :-**

संशोधन ग्रंथालय संशोधनपर सेवा व सुविधा संशोधकास पुरवीत असते. संशोधन ग्रंथालयामध्ये उपलब्ध सामुग्री , ग्रंथसंग्रह , कर्मचारी वर्ग , ग्रंथालय आर्थिक स्थिती , उपलब्ध जागा , उपकरणे, अशी विविध सेवा पुरवीत असते. संशोधन ग्रंथालय विविध सेवा पुरवीत असतात त्याचा आढावा देखील पुढे दिला आहे. या संशोधन साहित्याचा वापर करून संशोधानमध्ये गती निर्माण करण्यास मदत केली जाते. खालील प्रमाणे सेवा दिल्या जातात.

➢ प्रचलित जागरूक सेवा :- संशोधकास वाचन साहित्य प्रकाशित होण्यापूर्वी किवा संशोधन प्रकाशन झाल्यावर अद्यावत माहिती प्रसारित करत असते. याची माहिती वृत्तपत्र, नियतकालिका, वेबधारित सोर्स संशोधनासाठी आवश्यक साधन सामुग्री नेहमी प्रकाशित होत असते. सदर नवीन माहिती संशोधकास कळविणे गरजचे असते. यामुळे संशोधन नाविन्यपूर्ण होण्यास मदत होत असते.

➢ निवडक साहित्याचे प्रकाशन :- संशोधक यास संशोधकांनी मागणी केली असता ग्रंथालय कमी वेळेत पुरवितात. यामध्ये संशोधक यांना आवश्यक तीच माहिती जलद गतीने दिली जाते. ज्याचा वापर संशोधक संशोधनामध्ये पुरवीत असतात. निवडक माहिती मिळाल्यामुळे संशोधक यांची वेळेची बचत होण्यास मदत होते. त्यामुळे संशोधनामध्ये गती निर्माण होण्यास मदत होते.

➢ सार सेवा :- माहितीच्या युगात माहितीचा साठा मोठ्या प्रमाणात उपलब्धता आहे. यामधून संशोधकास आवश्यक माहिती मिळणे गरजेचे असते. व त्याप्रमाणे आढावा घेऊन त्याचा वापर करणेदेखील गरजेचे असते. संशोधक यांना थोडक्यात माहितीचे आराखडा व पुरवठा केला जातो.

➢ संदर्भ सेवा :- संदर्भ सेवे मध्ये वाचक व संशोधक यांना हवी असणारी माहितीचा पुरवठा केला जातो. संशोधनामध्ये संशोधक यांना संदर्भ साधनाचा आढावा घेणे गरजेचे असते. संदर्भ सेवा आढावा घेतल्यामुळे संशोधक यांना काही निर्णय घेणे शक्य होते . त्याचा वापर संशोधनामध्ये गती निर्माण होण्यास मदत होते.

➢ माहितीशोध सेवा :- संशोधकास त्यांच्या संशोधनपर असणारे निवडक माहिती व सेवा संदर्भ साधनामधून मिळवली जाते.माहितीशोध सेवा मुद्दे अनुसार माहितीचे संकलन व आढावा घेणे सोपे झाले आहे.

➢ भाषांतर सेवा :- संशोधनपर साहित्य विविध भाषांमध्ये ग्रंथालयामध्ये उपलब्ध असते त्याअनुशांघाने संशोधक यांना विविध भाषांतर सेवा आढावा घेणे सोपे जाते.

➢ प्रतिलिपी सेवा :- संशोधकास कधी कधी एखाद्या संशोधनाची सत्यता पडताळणी करणे गरजेचे असते त्यामुळे एखादी संशोधनाची मूळ प्रत पडताळणी करणे महत्वाचे असते अश्यावेळी प्रतिलिपी सेवाचा वापर मोठ्या प्रमणात केला जातो. त्यामुळे संशोधनामध्ये सत्यता येण्यासाठी मदत होते.

➢ माहितीचे आदान प्रदान सेवा :- संशोधन करताना संशोधक यांना विविध साधने व सामुग्री याची आवशकता असते अश्यावेळी ग्रंथालय संशोधक यांना माहिती आदान प्रदान सेवातून विशिष्ट प्रकारे मदत करत असतात.

➢ संगणकीय प्रणाली वापर :- संगणकीय प्रणालीमुळे संशोधक यांना विविध साधनाचा आढावा घेणे सोपे होते. यामुळे संशोधनामध्ये पारदर्शकता येण्यास मदत होते. आज संशोधानाध्ये गती येण्यासाठी संगणक महत्वाचे भूमिका निभावत आहे. संशोधनपर साहित्याचा आढावा घेणे व नाविन्यपूर्ण माहितीचा शोध घेण्यासाठी संशोधक यांना खूप फायदा होण्यसाठी निश्चितच मदत होत आहे.

- माहिती एकत्रीकरण सेवा :- संशोधक यांना संशोधनपर विषयाची माहिती ग्रंथालयातून विविध साधने व सेवा सुविधामुळे प्राप्त होत असते. माहिती एकत्रीकरण सेवामुळेसर्व माहिती एकाच ठिकाणी मिळवून दिली जाते.
- सद्यस्थिती अहवाल :- संशोधन ग्रंथालयामध्ये नाविन्यपूर्ण निर्णय , नोदी , आढावा , याची नोंद करून सद्यास्थित अहवाल प्राप्त करून दिला जातो. यामुळे संशोधन मध्ये नवीन ज्ञान भर पडत असते. अहवाल वाचन सद्यास्थीत परिस्थितीचे परिपूर्ण अहवाल देत असते. याचा फायदा संशोधक यांना होण्यास मदत होते.
- वृत्तपत्र कात्रण सेवा :- वृत्तपत्र कात्रण सेवामुळे संशोधक यांना नवीन शोध व संकल्पना व प्रोत्साहन सेवापर माहिती मिळवून दिली जाते. वृत्तपत्र कात्रण सेवामुळे संशोधक यांना अनेक नवीन गोष्टीची जाणीव होण्यास मदत होते.
- अहवाल व सूची सेवा :- संशोधनामध्ये लेख , सारसेवा , अहवाल ,सूची यांना खूप महत्व आहे. यामध्ये सद्यस्थिती आढावा घेणे सोपे जाते व त्याचा वापर संशोधनामध्ये कसा योग्य प्रकारे केला जाऊ शकतो याचा आढावा देखील यासेवा प्रणाली मध्ये केला जातो.
- नियतकालिके व वृत्तपत्र सेवा :- नियतकालिके व वृत्तपत्र सेवा याचा वापर देखील महत्वचा संशोधनासाठी होताना दिसत आहे. यामुळे संशोधन सद्य स्थितीचा आढावा घेणे महत्वाचे ठरत आहे.
- संगणक व वेबअधारित सेवा :- संगणक व वेबअधारित सेवा यामध्ये संशोधक नवीन संशोधन आढावा व प्रणालीचा वापर करत असतो. यामुळे संशोधनपर सेवाचा आढावा घेऊन संशोधन लवकर पूर्ण केले जाते. संगणकीय प्रणाली संशोधन कार्यास प्रोत्साहन दिले जाते.

**सारांश :-**

संशोधन ग्रंथालय संशोधनामद्धे महत्वाची भूमिका बजावत आहे. संशोधन ग्रंथालय काळानुसार बदलताना दिसत आहे. संशोधन ग्रंथालयातील सेवा व सुविधा मांडणी , अहवाल , भूमिका, साहित्य अश्या विविध बाबीचा अभ्यास केला जातो. संशोधन ग्रंथालय त्यांची भूमिका वेगळीप्रमाणे मांडताना दिसत आहे. नवीन सुधारणा व बदल स्वीकारताना दिसत आहे. संशोधन ग्रंथालय त्यांची भूमिका सुलभ करताना दिसत आहे.

**संदर्भ सूची :-**


- बोधनकर सुधीर व आलोणी विवेक , सामाजिक संशोधन पद्धती ,नागपुर ,साईनाथ प्रकाशन ,१९९९
- Dhiman, A.K. (2010).Librarian to Cybrarian: Changing Roles and Responsibilities ofLibrary Professionals.7th Convention Planner, 435-441.
- Digital Library of India. (2015). Welcome to Digital Library of India (DLI). Retrieved onMarch 26, 2017.
- Johnson, M. (2010). This Book is Overdue. How Librarians and Cybrarians Can SaveUs All. New York: HaperCollins.
- Joshi, Neha M. and Kamat, Rucha R. (2016). Cybrarian: Possibility with Indian Context.
- Webster dictionary. (2017). Cybrarian. Webster dictionary. Retrieved on April 1, 2017. from http://www.merriam-webster.com/dictionary/cybrarian